ePaper

## मुंबई ते सोलापूर मार्गावर 'वंदे भारत एक्स्प्रेस' धावणार, देवेंद्र फडणवीस



| वर्ष - 6 | अंक - 187 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- पुण्यात मुसळधार पावसाचं थैमान
- नदी पुनरुज्जीवनसह प्रलंबित प्रकल्पांना मिळणार गती !
- माझं चिन्ह, पक्षनाव गोठवलंत, पण एवढं करूनही...

www.mahaenews.com | बुधवार | दिनांक 19 ऑक्टोबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# वाहतूक पोलीस, वॉर्डनची संख्या वाढणार!

## खासदार श्रीरंग बारणे : विनाकारण व्यापा-यांना त्रास देवू नका

| पिंपरी-चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**सणांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी कॅम्पात वाहतूक पोलीस, वॉर्डनची संख्या वाढवावी. दिवाळीसह कोणत्याही सणात व्यापाऱ्यांना त्रास देवू नये. व्यापा-यांनीही कोणालाही त्रास होणार नाही अशा पद्धतीने व्यवसाय करावा. हॉकर्स झोन लवकरच जाहीर केला जाईल.**




व्यापा-यांवरील एकतर्फी कारवाई खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका, पोलीस अधिका-यांना दिला. खातरजमा करुनच कारवाई करावी. ते करताना नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. छोट्या व्यावसायिकांवर कारवाई करू नका, सर्वांनी सामंजस्याची भूमिका घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. त्यावर आजपासूनच कॅम्पात 48 अंमलदार आणि वॉर्डनची संख्या वाढविण्यात येत असल्याचे अधिका-यांनी सांगितले. त्यामुळे वाहतूक सुरळीत होईल. मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या पुढाकाराने पिंपरी कॅम्पातील व्यापा-यांच्या प्रश्नांसदर्भात आज (मंगळवारी) बी.टी. आडवाणी हॉलमध्ये बैठक झाली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, पोलीस उपायुक्त मंचक इप्पर, आनंद भोईटे, सहाय्यक पोलीस आयुक्त सागर कवडे, क्षेत्रीय अधिकारी सुचेता पानसरे, भूमी आणि जिंदगी विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रशांत जोशी, कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड, पिंपरीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर आवताडे, अर्जुन पवार, पिंपरी मर्चेट असोसिएशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवानी, माजी नगरसेवक डब्बू आसवानी, बाबा कांबळे, व्यापारी हरेश आसवानी, महेश मोठवानी आदी व्यापारी उपस्थित होते.

श्रीचंद आसवानी यांनी समस्या मांडल्या. कॅम्पात वाहतूक आणि हॉकर्सचा महत्वाचा प्रश्न आहे. फेरीवाल्यांना हटवावे. कॉपी राईटबाबत रोज रेड टाकल्या जात आहेत. व्यापा-यांना विनाकारण त्रास दिला जातो.

### फेरीवाल्यांवर अन्याय होणार नाही पण...

अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ म्हणाले, "व्यापारी, फेरीवाले कोणावरही अन्याय होणार नाही याची पालिका काळजी घेत आहे. दुकानदार आणि फेरीवाले दोघांनाही न्याय द्यायचा आहे. व्यापा-यांनी दुकानसमोर काऊंटर वाढविले आहेत. त्यामुळे पादचारी रस्त्यावरून चालतात. परिणामी, वाहतूक कोंडी होते. त्यासाठी व्यापाऱ्यांनी काऊंटरसाठी फुटपाथचा वापर करू नये. फुटपाथ मोकळे ठेवावेत. लोक त्यावरून चालतील आणि वाहतूक कोंडी कमी होईल. क्रोमाच्या शेजारी पार्किंगची व्यवस्था केली आहे. नो-पार्किंग झोनवर कारवाईसाठी पोलिसांना पत्र दिले.

### सर्वांनी स्वयंशिस्त पाळावी...

पोलीस उपायुक्त मच्चक इप्पर म्हणाले, "कॅम्पात वाहतूक कोंडीची समस्या आहे. पण, सर्वांनी स्वतः शिस्त पाळण्याची आवश्यकता आहे. त्याचे पालन केले तर प्रश्न सुटतील. व्यापारी दुकानासमोर माल ठेवतात, बोर्ड लावतात आणि पुढे वाहन पार्क करतात. त्यात पुढे हॉकर्स, हातगाडी असेल तर वाहतूक कोंडीत भर पडते. त्यासाठी स्वयंशिस्त महत्वाची आहे. दुकानदारांनी डिस्प्ले बोर्ड पुढे येवू देवू नयेत. दुकानादार, ग्राहकांनी पार्किंगमधेच वाहने लावावीत. कॉपी राईट्स करु नये. कोणावर अन्याय होणार याची दक्षता घेतली जाईल.

# 'एसटी'बाबत राष्ट्रवादीचा दुटप्पीपणा!

## एकनाथ पवार: तात्पुरत्या भाडेवाढवर आंदोलन करणारे संपावेळी कुठे होते?

| पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**एकनाथ पवार म्हणाले की, एसटीबाबत राष्ट्रवादीची भूमिका दुटप्पीपणा असून, राष्ट्रवादीची कथनी आणि करणी यामध्ये फरक आहे. आता आंदोलन करणारी राष्ट्रवादी एसटी संपाच्या वेळेस कामगारांच्या आत्महत्या बघून गप्प होती. सत्ता असतानाही एसटी आणि कामगारांना वाऱ्यावर सोडले होते.**

सण- उत्सवात सर्वसामान्य प्रवाशांना चांगली सुविधा देण्यासाठी कटिबद्ध असलेल्या 'एसटी' महामंडळाने तात्पुरती भाडेवाढ केल्याने आंदोलन करणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी एसटीचे कामगार संपावर होते. ज्यावेळी ५४ दिवस एसटी बंद होती, त्यावेळी कुठे होते? असा सवाल भाजपा प्रदेश प्रवक्ते एकनाथ पवार यांनी उपस्थित केला आहे.

राज्य परिवहन महामंडळाने (एसटी ) भाडेवाढ केल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहर राष्ट्रवादीने वल्लभनगर येथील एसटीच्या आगारामध्ये आंदोलन केले आणि ही भाडेवाढ मागे घ्यावी, अशी मागणी केली. यावर एकनाथ पवार यांनी टीका केली आहे.

एकनाथ पवार म्हणाले की, एसटीबाबत राष्ट्रवादीची भूमिका दुटप्पीपणा असून, राष्ट्रवादीची कथनी आणि करणी यामध्ये फरक आहे. आता आंदोलन करणारी राष्ट्रवादी एसटी संपाच्या वेळेस कामगारांच्या आत्महत्या बघून गप्प होती. सत्ता असतानाही एसटी आणि कामगारांना वाऱ्यावर सोडले होते.



आज ज्या ठिकाणी राष्ट्रवादीकडून आंदोलन करण्यात आले. त्याच आगारात संप सुरू होता. कामगार उपाशी होते त्यावेळी राष्ट्रवादीचे नेते फिरकलेसुद्धा नाही. आपल्याच एसटी कामगार बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी कुठल्याही प्रकारची सामोपचाराची भूमिका घेतली गेली नाही किंवा एकही कार्यकर्ता, पदाधिकारी पुढे आला नाही. त्यामुळे राष्ट्रवादीच्या नेत्यांनी आत्मचिंतन करावे.

### ... ही तर हंगामी भाडेवाढ : एकनाथ पवार

राष्ट्रवादीचे हे आंदोलन हास्यास्पद असल्याची टीका एकनाथ पवार यांनी केली. एसटी महामंडळाच्या परिवर्तनशील भाडेवाढ सुत्रानुसार गर्दीच्या हंगामात महसुल वाढीच्या दृष्टीने ३० टक्क्यांपर्यंत हंगामी भाडेवाढ करण्याचा अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटीला दिला आहे. त्यानुसार दरवर्षीप्रमाणे या हंगामातही दि.२० व २१ ऑक्टोबर रोजीच्या मध्यरात्री बारानंतर नंतर प्रवास सुरु करणा-या प्रवाशांना सुधारित १० टक्के वाढीव दराने भाडे आकारणी करण्यात येणार आहे. ही भाडेवाड ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यत राहील. दरवर्षीच अशी भाडेवाढ हंगामी स्वरूपात केली जाते. मात्र, राष्ट्रवादीचा याबाबत अभ्यास कमी पडत आहे का? असा उपरोधक सवालही एकनाथ पवार यांनी उपस्थित केला आहे.

# पुण्यात मुसळधार पावसाचं थैमान!

## दगडूशेठ मंदिरातही पाणीच पाणी

।पुणे । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्यातील अनेक भागात गेल्या काही दिवसांपासून परतीच्या पावसाने हजेरी लावली आहे. अनेक ठिकाणचं जनजीवन विस्कळीत झालं आहे. या परतीच्या पावसाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना सहन करावा लागतोय. काढणीला आलेलं उभं पिक या पावसामुळे नष्ट झालं आहे. त्यामुळे राज्यातील अनेक भागातील शेतकरी आता सरकारी मदतीची वाट बघत आहेत. या पुण्यातही परतीच्या पावसाने थैमान घातलं आहे. पुण्यातील अनके भागात जोरदार पावसामुळे रस्त्यांना नदीचे स्वरुप आल आहे. पुण्यातील प्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात देखील पाणी शिरलं आहे. त्यामुळे मंदिर प्रशासनाकडून रात्री उशीरापर्यंत पाणी बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु होते. याशिवाय श्रीमंत भाऊ रंगारी गणपती ट्रस्टच्या संग्रहायलातही पावसाचे पाणी शिरले, दरम्यान शहरातील अनेक भागात हीच स्थिती पाहायला मिळाली.**

पुण्यात रस्त्यावर जमा झालेल्या पावसाच्या पाण्यातून वाट काढताना पुणेकरांची दमछाक झाली. अनेक वाहनं ही पाण्यात अडकून पडली होती. याशिवाय सखल भागातही मोठ्याप्रमाण पाणी साचलं होतं, अनेक नागरिकांच्या घरातही पावसाचे पाणी शिरले. दरम्यान राज्यातील विविध भागात पावसानं धुडगूस घातला आहे. यामुळे नागरिकांना अनेक समस्या येत आहेत. यात पुण्यातील येवलेवाडी स्मशानभूमीजवळ, सुखसागर नगर, अंबामाता मंदिर, कोंढवा खुर्द, एनआयबीएम रोड, रास्ता पेठ, दारुवाला पुलाजवळ, सुखसागर नगर, डॉल्फिन चौक, बी टी कवडे रोड अग्निशमन केंद्र समोर, हडपसर, गाडीतळ अशा अनेक भागात पावसाचं पाणी शिरलं. त्यामुळे येथील नागरिकांना मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहे. विशेषत: या पावसामुळे वाहतुकीवर मोठ्याप्रमाणात परिणाम झाला. अलका टॉकीज परिसरातील रस्त्यांनाही नदीचे स्वरुप आले होते. यात अनेक दुचाकी वाहून गेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. कोंढवा, हडपसरमध्येही रस्ते जलमय झाल्याचे पाहायला मिळाले. दरम्यान या पावसाचा फटका महालक्ष्मी एक्सप्रेसलाही बसला आहे.



यात रमणा गणपती पर्वतीमध्ये एका ठिकाणी भिंतीचा भाग कोसळण्याची घटना घडली, तर दुसरीकडे हडपसरमध्ये आकाशवाणीजवळ झाडपडीची घटना समोर आली आहे. याशिववाय कोंढवा खुर्द भाजी मंडई येथे एका ठिकाणी मुसळधार पावसामुळे साचलेल्या पाण्यात 7 नागरिक अडकले पडले होते. यामध्ये 5 मोठे नागरिक आणि 2 लहान मुलांचा समावेश होता. मात्र या नागरिकांना सुखरुपपणे बाहेर काढण्यातं आलं आहे. तर सदा आनंदनगरमधून पाच जणांनाही पाण्यातून सुखरुप बाहरे काढण्यात यश आलं आहे. यामध्ये 3 लहान मुली 1 महिला 1 पुरुष होते. यामुळे पुण्यातील आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी रात्रीभर काम करत होते.

## मोकाट श्वान, पुणेकर हैराण !

### श्वानांच्या संख्येबाबत महापालिका अनभिज्ञ

### नसबंदी शस्त्रक्रिया करण्याची प्रक्रियाही ठप्प

।पुणे। महाईन्यूज ।


पुणे स्मार्ट सिटी, देशात वास्तव्यास सर्वोत्तम शहर अशी बिरूदावली मिरविणाऱ्या पुण्यात मोकाट श्वानांचा उच्छाद वाढला आहे. मोकाट श्वानांची नसबंदी शस्त्रक्रिया होत नसल्याने संख्याही वाढत आहे. विशेष म्हणजे शहरात मोकाट श्वानांची संख्या किती आहे, याची ठोस आकडेवारी आरोग्य विभागाकडे नाही. तर महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील श्वानांची गणना झालेली नाही.दरम्यान, करोना संसर्गाच्या



टाळेबंदीवेळी नसबंदीची प्रक्रिया ठप्प झाली होती. सध्या पाच संस्थांची त्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे, असा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे. टाळेबंदीच्या दोन वर्षांच्या काळात मोकाट श्वानांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे मोकाट श्वानांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. शहरातील मोकाट श्वानांचा प्रश्न गंभीर झाला आहे. रात्रीच्या वेळी मोकाट श्वान दुचाकीस्वारांच्या पाठीमागे लागत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे.

## जलमय कोंढवा, कात्रज परिसरातील विस्कळीत वीजपुरवठा सुरळीत

### महावितरणकडून भर पावसात रात्रभर अविश्रांत दुरुस्ती कामे



।पुणे। महाईन्यूज ।

शहर आणि परिसरात सोमवारी रात्री झालेल्या ढगफुटी सदृश पावसानंतर जलमय झालेल्या कोंढवा, कात्रज परिसरातील विस्कळित झालेला वीजपुरवठा महावितरणकडून भर पावसात रात्रभर दुरुस्ती कामे करून सुरळीत करण्यात आला. सोमवारी रात्री नऊच्या सुमारास ढगफुटी सदृश्य मुसळधार पाऊस झाला. काही वेळातच विविध भागामध्ये पाणी साचले. घरांमध्ये तसेच सोसायट्यांमध्ये पाणी शिरले. या पावसाचा महावितरणच्या वीजयंत्रणेला तडाखा बसला. त्यामध्ये प्रामुख्याने रास्ता पेठ, पद्मावतीसह पर्वती, बंडगार्डन विभागामधील २२ केव्ही क्षमतेच्या ११ वाहिन्यांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. महावितरणचे अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी रात्रभर पावसात दुरुस्ती कामाला वेग देत पहाटेपर्यंत टप्याटप्प्याने सर्वच अकरा वीजवाहिन्यांचा वीजपुरवठा सुरु केला. तसेच सकाळी दहा वाजेपर्यंत जलमय परिसरातील ९९ टक्के ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. दुपारी चार वाजेपर्यंत उर्वरित ग्राहकांकडील वीजपुरवठा टप्याटप्प्याने पूर्ववत करण्यात आले. आणखी दोन दिवस पाऊस राहणार असल्याची शक्यता असल्याने महावितरणचे पुणे परिमंडलातील अभियंते आणि कर्मचाऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा तसेच वीज सुरक्षेबाबत उपाययोजना करण्यासाठी सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### प्रलंबित मागण्यांसाठी कंत्राटी कामगारांचा

# पुणे महापालिकेवर आक्रोश मोर्चा!

## कामगार युनियनच्या वतीने महापालिकेवर आक्रोश झाडू मोर्चा

। पिंपरी । । महाईन्यूज ।

विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुणे महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने महापालिकेवर आक्रोश झाडू मोर्चा काढण्यात आला. दोन वर्षांपासून बंद केलेला बोनस, घरभाडे भत्ता, रजावेतन फरकासह कामगारांना दिवाळी पूर्वी अदा करण्यात यावा तसेच भविष्य निर्वाहनिधी, ई.एस.आय., दरमहाचे वेतन १०



तारखेच्या आत देण्यात यावेत, अशा मागण्या या वेळी करण्यात आल्या.

शहरातील उदयोन्मुख कलाकारांना याचा नक्कीच फायदा होणार आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

दिलीप गावडे म्हणावे की, शहरपातळीवर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु झाल्याने शहरातील नागरिकांना फायदा होणार आहे. शहरात सुरु झालेला हा उपक्रम शहरासाठी अभिमानास्पद आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कस्तुरी पायगुडे-राणे यांनी केले. सूत्रसंचालन आणि आभार

# प्रलंबित प्रकल्पांना मिळणार गती!

## आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आश्वासन



**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

इंद्रायणी, पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या ‘कन्सेप्ट मास्टर प्लॅन’ला महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण कमिटीची मान्यता घेण्यासह पिंपरी-चिंचवड शहराशी संबंधित विविध प्रकल्पांना गती देण्याबाबत पुणे जिल्हा पालकमंत्री तथा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे. पुणे येथील विधान भवनमध्ये पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडमधील प्रलंबित प्रश्नांबाबत प्रशासन आणि पालकमंत्र्यांचे लक्ष वेधले.

आमदार लांडगे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, इंद्रायणी व पवना नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाच्या ‘कन्सेप्ट मास्टर प्लॅन’साठी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण कमिटीची मान्यता घेण्यासाठी महापालिका प्रशासनाने राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे.

तसेच, आंतरराष्ट्रीय दर्जाचा सफारी पार्क विकसित करण्याचा प्रस्तावही राज्य सरकारकडे प्रलंबित आहे. त्यावर कार्यवाही करण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुख अधिकारी व लोकप्रतिनिधींची बैठक लावावी. यासह, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत १९७२ ते १९८३ या कालावधीत स्थानिक भूमिपुत्रांच्या संदादित केलेल्या जमिनंचा परताव्याबाबतचा प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित आहे. तसेच, पिंपरी- चिंचवड न्यायालयाला जागा उपलब्ध झाली असून, निधीची उपलब्धता करणे अपेक्षीत आहे. यासह शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामास गती देण्याबाबतही आमदार लांडगे यांनी पालकमंत्र्यांचे लक्ष वेधले.

### पिंपरी ते निगडी मेट्रो विस्तारास मंजुरी हवी : आमदार लांडगे

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टीने पुणे-पिंपरी-चिंचवड मेट्रो प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचा पहिला टप्पा कार्यान्वयीत झाला असून, आता पिंपरी ते निगडीपर्यंत आणि हिंजवडी ते चाकण मार्गाबाबत प्रस्ताव तयार केला असून, त्याला मंजुरी मिळाली पाहिजे. महावितरण संबंधित मोशी सफारी पार्क येथे सब स्टेशन उभारणे गरजचे आहे. त्यामुळे जाधववाडी, मोशी, डूडूळगाव, वडमुखवाडी, आळंदी, चोविसावाडी, चिखली या भागातील वीज पुरवठा सुरळीत करता येईल. तसेच, प्राईड वर्ल्ड सिटी, चऱ्होली येथे अतिउच्चदाब सबस्टेशन उभारल्यास चऱ्होली गाव, दिघी, लोहगाव या भागातील वीज ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. यासह भोसरी मतदार संघातील महावितरण संबंधित कामे मार्गी लावण्यासाठी निधीची उपलब्धता व्हावी, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

### विविध प्रलंबित विषयांसाठी पालकमंत्र्यांना साकडे...

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ (मौजे तुळापूर ता. हवेली) आणि समाधी स्थळ (वढू बु. ता. शिरुर) विकास आराखडा मंजूर करण्यात यावा. त्याद्वारे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारक उभारण्यास गती द्यावी. पिंपरी येथील फुलबाजारासाठी शेजारील जागा उपलब्ध करणे. पुणे- नाशिक महामार्गाच्या रुंदीकरणासाठी भूसंपादनाकरिता निधी उपलब्ध व्हावा. त्रिवेणीनगर ते रावेत स्पाईन रोड बाधित नागरिकांना पर्यायी भूखंड वाटप, महापालिका मेडिकल कॉलेज, पॅरामेडिकल कोर्सेस सुरू करणेकामी निधी मिळावा, प्रस्तावित संविधान भवनच्या कामाला गती द्यावी तसेच तळवडे ते चऱ्होली नदीपात्रातून रस्ता विकसित करुन रेसिडेन्सिअल कॉरिडॉर व इंडस्ट्रिअल कॉरिडॉरमधील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी विकास आराखडा तयार करण्यात यावा यासाठी संबंधित विभागांना आदेश करावेत, अशी मागणी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे करण्यात आली आहे.

# गोरगरीब लहान बाळांसाठी एवढे कराच !

## आमदार लक्ष्मण जगताप यांची साद, आरोग्यमंत्री प्रा. तानाजी सावंतांकडे मागणी

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**





जन्मताच ऐकू न येणाऱ्या लहान बाळांवर राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व एडीआयपीअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया केली जाते. त्यासाठी दोन वर्षापर्यंतची वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ही वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत वाढवून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या गोरगरीबांच्या घरातील लहान बाळांना शासनाने दिलासा द्यावा, अशी मागणी आमदार लक्ष्मण जगताप यांनी राज्याचे आरोग्यमंत्री प्रा. तानाजी सावंत यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आमदार लक्ष्मण जगताप यांनी आरोग्यमंत्री प्रा. तानाजी सावंत यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, “केंद्र व राज्य शासनाकडून जन्मताच कानाने ऐकू न येणाऱ्या लहान बालकांसाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व एडीआयपीच्या अंतर्गत कॉकलीअर इम्प्लांट (COCHLEAR IMPLANT SURGERY) सर्जरी केली जाते. ही योजना १ एप्रिल २०१३ पासून सर्व जिल्हयांत लागू करण्यात आली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या गोरगरीब कुटुंबांतील असंख्य लहान बाळांना जन्मताच ऐकू येत नसल्याचे वास्तव आहे. अशा लहान बाळांवर शस्त्रक्रियेसाठी शासनाने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमासारखे मोठे कवच तयार केलेले असताना देखील शासनानेच नेमून दिलेली अनेक रुग्णालये शस्त्रक्रिया करण्यासाठी पैशाची मागणी करत आहेत, हेही तितकेच वास्तव आहे.

त्यामुळे अनेक गोरगरीब कुटुंब आपल्या लहान बाळांवर पैसे नसल्यामुळे उपचार करण्यासाठी टाळाटाळ करत आहेत. परिणामी संबंधित बाळांवर वेळेत उपचार न झाल्याने वेळ निघून जाते व बालकाचे वय वाढत जाते. त्यामुळे शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनेनुसार दोन वर्षावरील मुलांवर शस्त्रक्रिया केली जात नाही. राज्यात अशी असंख्य बालके आहेत की जे दोन वर्षपेक्षा तीन महिने व चार महिने मोठे आहेत आणि ज्यांना जन्मताच ऐकू येत नाही. या लहान बाळांना शासनाच्या नियमानुसार राष्ट्रीय बाल विकास स्वास्थ्य योजनेत समाविष्ट करून घेतले जात नाही.

### तालुका, पंचायत समिती स्तरावर शिबिरांची आवश्यकता...

**राज्यातील असंख्य गोरगरीब कुटुंबांतील जन्मताच ऐकू न येणाऱ्या लहान बाळांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजने अंतर्गतच्या लाभार्थ्यांचे वय पाच वर्षापर्यंत करावे. केंद्र शासन एडीआयपीअंतर्गत पाच वर्षापर्यंतच्या बालकांसाठी शस्त्रक्रिया करण्याची योजना राबवत असेल, तर महाराष्ट्र शासनाने देखील याचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. त्याचप्रमाणे ही योजना राज्यातील खेड्यापाड्यापर्यंत लोकोभिमुख होण्यासाठी जनजागृती गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक तालुका व पंचायत समिती स्तरावर मार्गदर्शन शिबिर राबविण्याची आवश्यकता आहे. कॉकलीअर इम्प्लांटसाठी (COCHLEAR IMPLANT SURGERY) शासनाने नेमून दिलेल्या रुग्णालयांना आपल्या स्तरावरून योग्य त्या सूचना कराव्यात व रुग्णालय स्तरावर प्रलंबित असलेली शस्त्रक्रियेची प्रकरणे मार्गी लावण्याकरिता संबंधितांना योग्य त्या कार्यवाहीचे निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.”**


## संपादकीय


# महागाईचे आव्हान

***भारताची सारी अर्थव्यवस्था ही आयात तेलाशी इतकी निगडीत आहे की, तेलाच्या भावातली थोडीशी वाढही भारताचे अर्थचक्र बिघडवू शकते. आजही ८० ते ८५ टक्के क्रूड ऑईल आपण आयातच करतो. तेलाचे भाव वाढले की सगळेच भाव वाढू लागतात.***

भारतात सणासुदीची धामधूम सुरू असली तरी देशांतर्गत महागाई, घसरता शेअर बाजार आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा नवा अंदाज या तीनही आघाड्यांवर काहीसे काळजीत पडावे, असे चित्र आहे. जागतिक बँक आणि नाणेनिधी या दोन्ही संस्थांचे अंदाज वेळोवेळी बदलणारी स्थिती पाहून व्यक्त केले जातात. त्यामुळेच, नाणेनिधीने जुलैत भारताच्या वृद्धिदराबाबत व्यक्त केलेला अंदाज आणि आत्ताचा अंदाज यात तफावत आहे. तेव्हा नाणेनिधीने पुढच्या वर्षी म्हणजे २०२३ मध्ये भारताचा वृद्धिदर ७.४ टक्के असेल, असे म्हटले होते. तो आता ६.८ वर आणला आहे. सारे जग मंदीच्या दिशेने जात असले आणि जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा हा अंदाजित वृद्धिदर सर्वांत अधिक असला तरी भारताच्या दृष्टीने ही समाधानाची बाब नाही. पुढच्या वर्षी जगात भारतापेक्षा केवळ सौदी अरेबियाचा आर्थिक विकासाचा दर जास्त असेल. तो ७.६ असण्याची शक्यता आहे. नाणेनिधी हा अंदाज व्यक्त करीत असतानाच अमेरिकेत असणाऱ्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विकास आणि महागाईवर नियंत्रण या दोन्ही आघाड्यांवर नियंत्रण मिळविण्याची आकांक्षा व्यक्त केली आहे. परदेशी भूमीवर त्यांनी अर्थव्यवस्थेचे समर्थन करणे, हे स्वाभाविक असले तरी देशातील महागाई कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत चालली आहे आणि तिचा अधिकाधिक फटका तळागाळातल्या समाजाला बसत आहे. त्यांना केवळ विकासाचे आकडे सांगून चालणार नाही. प्रत्यक्ष दिलासा द्यावा लागेल. भारतीय अर्थकारणावर ताण आणणाऱ्या घटना घडत आहेत. त्यातली पहिली युक्रेन युद्धाची. ते तसेच चालू राहिले तर पुढच्या वर्षी क्रूड तेल तसेच धान्यांच्या किमती वाढू शकतात. भारताला धान्य आयात करावे लागले नाही तरी खाद्यतेले तसेच इंधनतेल आयात करावे लागतेच. दुसरीकडे, अमेरिकेसहित युरोपची अर्थवाढ अत्यंत वेगाने कमी होणार आहे. स्वाभाविकच तेथील मागणी घटू शकते. याचाही ताण आपल्यावर येऊ शकतो. चीनचीही अर्थव्यवस्था साडेचार टक्क्यांच्या पुढे जाणार नाही. या साऱ्यांचा परिणाम भारताला भोगावा लागणार असून अनेक प्रकारच्या प्रतिकूल स्थितीत पुढच्या वर्षी वाटचाल करावी लागणार आहे.

# भाषाच नव्हे, जीवनही धोक्यात!




गेल्या काही दशकांपासून जगभरच भाषा, संस्कृतीच्या अंगाने समग्र अधिवास, पर्यावरण आणि जीवनरक्षणाच्या चळवळी वाढीस लागल्या आहेत. वाघ जगवणे यांचा अर्थ जसे संपूर्ण दाट जंगल जगवणे असा असतो तसेच भाषा जगवणे याचा अर्थ भाषासंबद्ध समग्र संस्कृती आणि जीवन परिवेश जगवणे असा असतो. आपल्याकडे दोन-चारच लोक ते सातत्याने करत असताना दिसत असले व बाकीचे काठावर उभे राहून फक्त कौतुकाने बघत असले तरी सर्वत्र ही स्थिती सारखीच नाही. स्थितीत ही सुधारणा करण्यात 'युनेस्को'चे गेल्या तीन दशकांपासूनचे योगदान पायाभूत महत्त्वाचे राहिले आहे. सदस्य राष्ट्रांमधील राज्यकर्ते, प्रशासक, धोरणे यावर आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे, सर्वेक्षणे, अध्ययने, अहवाल, दस्तावेज, करार अशा माध्यमातून युनेस्कोचे फार मोलाचे योगदान स्वभाषा, संस्कृती जतन, संवर्धन याबाबतची जागरूकता व ही साक्षरता वाढवण्यात राहिले आहे. फक्त राज्यकर्ते आणि धोरणकर्ते, जो संवाद युनेस्कोच्या पातळीवर याबाबत चालतो तो विविध माध्यमांतून, धोरणांमधून, संस्थात्मक यंत्रणा उभारून, तज्ज्ञ व अभ्यासकांनी सुसंवाद राखण्याचे सपशेल टाळून, खाली झिरपू देत नाहीत. आपले कोण लोक युनेस्कोच्या याबाबतच्या सर्व यंत्रणांमध्ये आहेत त्यांनी पडद्याआड व केवळ शासन आणि सत्तानुकूल कामे करण्याऐवजी सरळ लोकांना या बाबत प्रबोधित करणे जास्त आवश्यक आहे. मात्र, ते तसे करत नाहीत.

निर्वाचित जनप्रतिनिधी तर, याबाबत मुळीच स्वयंशिक्षित होऊ इच्छित नाहीत आणि तुम्ही त्यांच्याशी कितीही संवादी राहा, ते चुकूनही अभ्यासक, तज्ज्ञ यांच्या संपर्कात राहू इच्छित नाहीत, प्रतिसाद देत नाहीत. एवढी या पातळीवरची टोकाची राजकीय उदासीनता जपणारी आपली लोकशाही जगातली अपवादभूत लोकशाही आहे. याबाबत जणू ते आपल्याला उत्तरदायी नाहीतच व तसे न राहाणे हा जणू त्यांचा विशेषाधिकारच आहे, अशा थाटातच ते आपली उपेक्षा करीत असतात, हादेखील प्रत्यक्षानुभवच आहे. मात्र, सततच्या कार्याने आणि पाठपुराव्यामुळे या स्थितीतही पुढे बदल होणारच आहे. कारण जनप्रतिनिधी आणि राजकारणही वेगाने बदलणार आहे. आपण तेवढे टिकून असावे.

भाषिक, सांस्कृतिक विविधता आणि जैविक विविधता या वेगवेगळ्या बाबी नसून एकाच जीवनाच्या बाजू आहेत. या परस्परावलंबी आहेत. भाषा, संस्कृती कोणतीही, कोणाचीही असो, ते मुळात माणसाचे संचित आहे. माणसाची निर्मिती आहे. ती कोणत्याही एखाद्याच विशिष्ट धर्म, संप्रदायापुरती मर्यादित बाब नाही. कारण समस्त मानवजातीचे सांस्कृतिक शहाणपणाचे वहन करण्याची ती माध्यमे आहेत. त्यामुळे कोणत्याही एखाद्या शब्द, भाषा, संस्कृतीचा क्षय अथवा विलय हा तेवढ्याच लोकांशी संबंधित बाब उरत नाही. एकूणच मानवी संचितातच होणारी ती घट असते. जगभरची भाषा संशोधने, सर्वेक्षणे, अध्ययने, वारंवार हेच लक्षात आणून देत आहेत. जगातल्या सुमारे सहा हजार बोली, भाषांना या क्षयाचा, विलयाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. परिणामतः भाषा व संस्कृती विषयक धोरणे आणि भाषा, संस्कृती जतन, संवर्धन हे केवळ हौसेपोटी, हौशी मंडळींनी तेवढे करत राहाण्याचे कार्य उरले नसून ती जगभरच अत्यावश्यक बाब झाली आहे.

# तरच शिक्षणसंस्थांचे संचालक जागे होतील?

**नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण यशस्वी व्हायचे असेल तर शिक्षणसंस्था चालविणाऱ्या संचालकांनी पुढाकार घेऊन स्वागतशील व्हावे लागेल. बदल करावे लागतील**

भविष्यवेधी दृष्टी ठेवावी लागेल. हे खरेच होईल का? केंद्र सरकारच्या संस्थांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून याचे नियोजन सुरू आहे. राज्य सरकारच्या अखत्यारीतली विद्यापीठे तसेच संलग्न महाविद्यालये यात मात्र म्हणावे तसे नियोजन नाही. दोन सप्टेंबर २०२२ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांमुळे आता राज्यस्तरावर या विषयाला गती येईल.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये अभ्यासक्रमांतील बदलांबरोबरच शैक्षणिक संस्थांमध्ये रचनात्मक बदलही अपेक्षित आहेत. सन २०३५ पर्यंत विद्यापीठांना संलग्नित महाविद्यालये ही रचना कालबाह्य होणार आहे. प्रत्येक महाविद्यालय हे पदवी प्रदान करणारे बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्था असेल. सर्व महाविद्यालये अशी स्वायत्त होण्यासाठी कालबद्ध योजना हवी. पदवी प्रदात्या बहुविद्याशाखीय स्वायत्त संस्थेचा दर्जा मिळवण्यासाठी चांगले नॅक मानांकन मिळवून स्वायत्त महाविद्यालयांचा दर्जा प्राप्त करणे किंवा अन्य संस्थांशी सहयोग करून



समूह तयार करणे किंवा विद्यापीठाचे घटक महाविद्यालय बनणे हे पर्याय आहेत.

आजचे महाविद्यालयीन शिक्षण हे बंदिस्त तसेच खंडित आहे. यामध्ये एका विद्याशाखेत शिकताना अन्य विद्याशाखेतील विषय शिकण्याची सोय नाही. पारंपारिक उच्च शिक्षणात व्यावसायिक तसेच व्यवसाय (व्होकेशनल) शिक्षणाचा अंतर्भाव व्हावा, ही बहुविद्याशाखीय शिक्षणात अंतर्भूत कल्पना आहे. यामध्ये भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान, भारतीयत्व, कला, नृत्य, नाटक, शिक्षणशास्त्र, गणित, संख्याशास्त्र, मूलभूत व उपयोजित विज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, खेळ, भाषांतर अशा विषयांचे विभाग बहुविद्याशाखीय संस्थेत असावेत ही कल्पना आहे. केवळ एखाद्या विषयाचे (उदा. शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र, विधी वगैरे) महाविद्यालय या संकल्पनेतून बाहेर येऊन सर्व विद्याशाखेतील विविध विषय विद्यार्थ्यांना अभ्यासता येतील, अशी कल्पना नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात आहे. भारतामध्ये उच्च शिक्षण संस्थांमध्ये अनेक प्रकार आहेत. यात आयआयटी, एनआयटी, आयआयएम अशा कायद्याने स्थापित व अनुदानित संस्था आहेत. तसेच, केंद्रीय विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे, खाजगी व अनुदानित अभिमत विद्यापीठे, राज्यस्तरीय सार्वजनिक विद्यापीठे आहेत. महाविद्यालयांतही शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित असे प्रकार आहेत.

यामधील बऱ्याच शैक्षणिक संस्था एकात्मिक पद्धतीच्या (एकाच विद्याशाखेचे) शिक्षण देतात. त्यामुळे केंद्र सरकारच्या संस्थांपासून ते तालुक्यातील एखाद्या महाविद्यालयांपर्यंत सर्वांना बहुविद्याशाखीय शिक्षणसंस्थेत परिवर्तीत करताना अनेक रचनात्मक बदल करावे लागतील. या जीवाणूंमुळे शरीरातील पचनक्रिया सुधारते; पोषणाचे शोषण अधिक चांगल्या रीतीने होते आणि रोगप्रतिकारकशक्ती वाढते.

## ।। अभंगवाणी ।।



न ये नेत्रां जळ ।
नाहीं अंतरीं कळवळ ॥१॥
तों हे चावटीचे बोल ।
जन रंजवणें फोल ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# माझं चिन्ह, पक्षनाव गोठवलंत, पण एवढं करूनही...

## उद्धव ठाकरेंचं भाजपावर टीकास्त्र!

।मुंबई। महाईन्यूज।



शिवसेनेत बंडखोरी झाल्यानंतर राज्यातलं राजकारण ढवळून निघालं आणि एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार अस्तित्वात आलं. यानंतर शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण चिन्हावरही बंडखोर गटाने दावा केला. मात्र, निवडणूक आयोगानं या दोन्ही गोष्टी गोठवल्यामुळे त्यावरून ठाकरे गट आणि शिंदे गट यांच्यात आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण पाहायला मिळत आहे. अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपालाही ठाकरे गटाकडून लक्ष्य करण्यात येत आहे. बुलढाण्यातील शिवसेना कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी 'मातोश्री'वर बोलताना उद्धव ठाकरेंनी अंधेरी निवडणुकीवरून भाजपावर टीकास्त्र सोडलं आहे. तसेच, पक्षनाव आणि चिन्ह परत मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### राजन साळवींनाही प्रलोभनं

दरम्यान, राजन साळवींनाही शिवसेना सोडण्यासंदर्भात प्रलोभनं दाखवली गेली, असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. "इथे राजन साळवी उभे आहेत. त्यांच्यावरही दडपण आणलं गेलं. प्रलोभनं दाखवली गेली. पण हा माणूस हलला नाही. ते आज इथे आले. रत्नागिरी, कोकण परिसरात गद्दारांना गाडून त्यांच्या छाताडावर उभं राहण्यासाठी ते इथे आले आहेत", असं उद्धव ठाकरे म्हणाले.

### "आयोगाचा निर्णय तात्पुरता"

"धनुष्यबाण गोठवलं तरी हातातली मशाल घेऊन तुम्ही पुढे जात आहात. प्रत्येक चिन्हाचं एक महत्त्व असतं. रामाने धनुष्यबाणानेच रावणाला मारलं होतं. तर अन्याय जाळणारी आणि अंधारात वाट दाखवणारी मशाल असते. निवडणूक आयोगानं काही काळापुरता हा आदेश दिला आहे.नंतर आपलं नाव आणि चिन्ह वगैरे परत मिळणारच आहे", असं उद्धव ठाकरे म्हणाले. मी विनंती का करू?"

अंधेरी पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी उद्धव ठाकरेंनी भाजपा, एकनाथ शिंदे गट आणि इतरांना विनंती करावी, असं मत व्यक्त केलं जात होतं. त्यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, "अंधेरीची पोटनिवडणूक होणार आहे. त्याबद्दलही काही जणांना वाटतं की मी विनंती केली नाही. पण मी का विनंती करू?" असा सवाल त्यांनी केला.

### "शिवसेना संपवण्यासाठीच हे सगळं केलं गेलं"

"माझ्या पक्षाचं नाव गोठवलंत, माझं चिन्ह गोठवलंत. एवढं करूनही उमेदवार देऊन नंतर पळ काढलात. मग एवढं सगळं कशाला केलं? फक्त आपल्याला मनस्ताप द्यायचा, आपल्याला छळायचं आणि शिवसेना संपवायची यासाठी हे सगळं केलं गेलं", असा आरोप उद्धव ठाकरेंनी भाजपावर केला.

---

## झाडू अन् व्हॅक्युम क्लिनरच्या जमान्यातही केरसुणीचा मान

### आधुनिक झाडुची किंमत 150 ते 200 रुपयांच्या घरात

।नाशिक ।महाईन्यूज।



झाडू, मॉप, रोपो क्लिनर आणि व्हॅक्युम क्लिनरच्या जमान्यातही लक्ष्मी स्वरुप मानल्या जाणाऱ्या पारंपरिक केरसुणीने आपला मान कायम ठेवला आहे. यंदा पावसाचा फटका बसल्याने केरसुण्यांचे दरही वाढले आहेत. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले असले तरीही परंपरा, संस्कृती आणि काही गोष्टीचे धार्मिक महत्त्व कमी होत नसल्याचे दिवाळीसारख्या सणउत्सवांत दिसून येते. लक्ष्मीपुजनात आवर्जून स्थान असणाऱ्या केरसुणीमुळे ही बाब पुन्हा अधोरेखित झाली आहे.

दिवाळी खरेदीत आकाशकंदील, पणत्या, फटाके आणि कपड्यांसोबत केरसुणीचाही समावेश असतो. घर झाडण्यासाठी पूर्वी पारंपरिक पद्धतीने वापरली जाणारी फडाची केरसुणी आता दुर्मिळ होऊ लागली आहे. त्यामुळे केरसुणी बनविणारे अन्य व्यावसायांकडे वळले आहेत. मात्र, काही व्यक्तींनी आजही पारंपरिक व्यवसाय टिकवून ठेवला आहे. अनेक वर्षांपासून दिवाळी सणात धनत्रयोदशीला केरसूणीची खरेदी करून लक्ष्मीपूजनाला तिची पूजा केली जाते. पावसामुळे केरसुणी बनवण्यासाठी लागणारे साहित्य भिजल्याने केरसुणीचे भाव २० टक्क्यांनी वाढले आहेत. असे असतानाही मोठ्या कष्टाने केरसुणी बनविणाऱ्या कारागिरांच्या हाती फार काही पडत नाही.

### अशी बनते केरसुणी !

केरसुणी हे घर आणि परिसरातील कचरा साफ करण्यासाठी वापरले जाते. मोळ नावाच्या गवतापासून किंवा शिंदीच्या झाडाच्या पानांपासून केरसुणी तयार केली जाते. जंगलांमधून शिंदीची झाडे संपुष्टात येत असल्याने आता ही पाने परराज्यांतून आणावी लागतात. दिवाळी सणामध्येच केरसुणी बनवण्याचा व्यवसाय चालतो. या कालावधीमध्ये दिवसाला ४० ते ५० केरसुण्या बांधल्या जातात. यातून मिळणारा मोबदला मात्र किरकोळच असतो. केरसुणी ६० ते ८० रुपयांना विकली जाते. तर, आधुनिक झाडुची किंमत १५० ते २०० रुपयांच्या घरात आहे.

---

## वॉटरग्रेसच्या 'भाईगिरी' विरोधात न्यायालयीन लढा

### कर्मचाऱ्यांना न्याय न दिल्यास खळ्ळखटयाकचा इशाराही मनसेने दिला आहे.

। नाशिक ।महाईन्यूज।



सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनातून रक्कम हडप करणे, ठेकेदारांचा आयडी ब्लॉक करणे, बोनसवर डल्ला मारणे अशा ठेकेदाराच्या मनमानी कारभाराला वैतागलेल्या वॉटरग्रेसच्या कर्मचाऱ्यांनी आता संबधित ठेकेदाराविरोधात मनसेच्या नेतृत्वात वज्रमूठ केली असून सोमवारी (दि.१७) पालिकेच्या प्रवेशव्दारावर मनसे कामगार सेनेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. कर्मचाऱ्यांना न्याय न दिल्यास खळ्ळखटयाकचा इशाराही मनसेने दिला आहे.

यावेळी कर्मचाऱ्यांनी जाहीरपणे आरोप केले. यावेळी सांगण्यात आले की, वॉटरग्रेसचे ठेकेदार चेतन बोरा, कैलास मुदलीयार यांच्या भाईगिरीमुळे कर्मचारी वैतागले आहेत. कर्मचाऱ्यांना कामावर रूजू करून घेण्यासाठी 10 ते 15 हजारांची मागणी करण्यात येते. तसेच, पालिकेकडून कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या १८ हजार रूपये वेतनातून सात हजार रूपये हे ठेकेदाराच्या घशात घालावे लागतात असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. भाईंच्या पंटरसमोर एटीएममधून हे पैसे काढून द्यावे लागत असल्याचीही तक्रार करण्यात आली आहे.

### आयुक्त करणार प्रकरणाची चौकशी

दरम्यान सोमवारी सकाळी सफाई कर्मचारी महापालिका मुख्यालयासमोर जमले होते. यावेळी मनसेच्यावतीने व्दारसभा घेण्यात येऊन कर्मचाऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. तसेच मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांची भेट घेऊन सदरचा प्रकार कथन केला. त्यानुसार आता आयुक्तांकडूनही याबाबत चौकशी करण्यात येणार असून मनसेच्यावतीने ठेकेदारांविरोधात न्यायालयीन लढाई लढण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### तक्रार मागे घेण्यासाठी ठेकेदाराचा दबाव

यावेळी झालेल्या सभेप्रसंगी कामावर रूजू करून घेतांना कर्मचाऱ्यांकडून दहा ते पंधरा हजार रूपये घेण्यात आल्याची तक्रार करण्यात आली. तसेच महिलांशीही गैरवर्तन करण्यात येत असल्याची गंभीर तक्रार महिला कर्मचाऱ्यांनी केली. तक्रार मागे घेण्यासाठी काही कर्मचाऱ्यांवर वॉटरग्रेसच्या भाईंकडून दबाव येत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. त्यानुसार आता गत पावणे तीन वर्षांतील बँक स्टेटमेंट आणि तक्रार अर्ज महापालिका आयुक्तांकडे सादर करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. कोणताही भाई असो त्यांना घरी पाठवू असा इशारा मनसे शहराध्यक्ष दिलीप दातीर यांनी यावेळी दिला.

# ऐन दिवाळीत बंगालच्या उपसागरात धडकणार चक्रीवादळ!

## महाराष्ट्रावरही होणार परिणाम?

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**अलीकडेच अमेरिकेच्या हवामान खात्याने पूर्व भारतात 'सुपर चक्रीवादळ' धडकण्याची शक्यता वर्तवली होती. पण शनिवारी भारतीय हवामानशास्त्र विभागानं (IMD) हा अंदाज फेटाळून लावला. तसेच पूर्व भारतात कोणत्याही प्रकारच्या चक्रीवादळाचा धोका नसल्याचं हवामान विभागाने म्हटलं.**



### चक्रीवादळाचा महाराष्ट्राला धोका किती?

सध्या महाराष्ट्राला परतीच्या पावसानं झोडपून काढलं आहे. अनेक ठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस कोसळला आहे. ऐन दिवाळी बंगालच्या उपसागरात धडकणाऱ्या संभाव्य चक्रीवादळाचा महाराष्ट्रालाही कमी-अधिक प्रमाणात धोका आहे. 'सीतरंग' चक्रीवादळाचा परिणाम म्हणून २३ आणि २४ ऑक्टोबर रोजी पूर्व महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्याच्या परिसरात पावसाची शक्यता आहे.

तथापि, मंगळवारी सकाळी कोलकाता येथील आयएमडीच्या प्रादेशिक हवामान केंद्राने बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ धडकणार असल्याची माहिती दिली आहे. सोमवारी दक्षिण अंदमान समुद्र आणि त्याच्या आसपासच्या परिसरात सौम्य चक्रीवादळ निर्माण झाल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. आज सकाळपर्यंत हे वादळ उत्तर अंदमान समुद्र परिसरात होते, अशी माहितीही कोलकता येथील प्रादेशिक हवामान केंद्राने दिली. पुढील ४८ तासांत दक्षिण-पूर्व बंगाल आणि लगतच्या भागत हवेच्या कमी दाबाचं क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. २२ ऑक्टोबरपर्यंत याचं चक्रीवादळात रुपांतर होईल. त्यानंतर हे वादळ पश्चिम-वायव्य दिशेने पुढे सरकण्याची शक्यता आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात हे चक्रीवादळ आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे," अशी माहिती कोलकाता येथील IMD च्या RWFC ने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात दिली आहे. या वादळाचं नाव 'सीतरंग' ठेवण्यात आलं असून या वादळाची दिशा नेमकी कशी असेल? याबाबत आताच भाष्य करणं खूप घाईचं असेल, असं मत हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

**दक्षिण-पूर्व बंगाल आणि लगतच्या भागत हवेच्या कमी दाबाचं क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. २२ ऑक्टोबरपर्यंत याचं चक्रीवादळात रुपांतर होईल. त्यानंतर हे वादळ पश्चिम-वायव्य दिशेने पुढे सरकण्याची शक्यता आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात हे चक्रीवादळ आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे,"**

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या जीवाला धोका

## आयएसआय आत्मघाती हल्ला करण्याच्या तयारीत

**। नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पाकिस्तानच्या आयएसआयच्या निशाण्यावर आहेत. गुप्तचर यंत्रणांनी कागदपत्र सादर करून याबाबत माहिती दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आत्मघाती हल्ला करण्याची व्यूहरचना आखली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला करण्यासाठी लश्कर ए तोयबाचे दहशतवादी रॅली किंवा कोणत्याही रोड शोमध्ये घुसू शकतात असंही गुप्तचर यंत्रणांनी सांगितलं आहे. एका हिंदी वृत्त संकेतस्थळाने ही माहिती दिली आहे.

गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमात आत्मघाती हल्ला होण्याची शक्यता आहे. दहशतवादी पोलिसांच्या वर्दीत येऊन मोदींच्या कार्यक्रम स्थळी आत्मघाती हल्ला करतील. काही दहशतवादी सुरक्षारक्षकांच्याही संपर्कात असल्याचं बोललं जात आहे. पुढच्या महिन्यात नरेंद्र मोदी संपूर्ण आठवडाभर गुजरात, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यापार्श्वभूमीवर गुप्तचर यंत्रणांना मिळालेली ही माहिती गांभीर्याने घेतली जात आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. भारतातील मोठ्या नेत्यांना निशाणा बनवण्याचे आदेश आयएसआयने आपल्या दहशतवाद्यांना दिले आहेत.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आत्मघाती हल्ला करण्याची व्यूहरचना आखली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला करण्यासाठी लश्कर ए तोयबाचे दहशतवादी रॅली किंवा कोणत्याही रोड शोमध्ये घुसू शकतात असंही गुप्तचर यंत्रणांनी सांगितलं आहे. एका हिंदी वृत्त संकेतस्थळाने ही माहिती दिली आहे.**

# भाजप प्रवेशासाठी चौकशीद्वारे दबाव!

## मनीष सिसोदिया यांचा दावा

**।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

"आपल्याविरुद्ध दाखल केलली प्रकरणे खोटी असून, गुजरात विधानसभा प्रचारापासून रोखण्यासाठी भाजपचा प्रयत्न सुरू आहे," असा आरोप दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी सोमवारी केला. अबकारी धोरणाच्या अंमलबजावणीतील कथित गैरव्यवहार प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) सिसोदिया यांनी चौकशीसाठी बोलावले होते. त्याआधी त्यांनी हा आरोप केला. त्यांची सोमवारी चौकशी करण्यात आली.

ही चौकशी सुमारे नऊ तास चालली. चौकशीनंतर सायंकाळी पत्रकारांशी बोलताना सिसोदिया म्हणाले की, आजच्या या चौकशीत



आम्हाला समजून चुकले आहे की, ही चौकशी म्हणजे भाजपच्या 'ऑपरेशन लोटस'चा भाग आहे. मी आप सोडून भाजपमध्ये जावे, त्यासाठी हा दबाव आणला जात आहे. 'सीबीआय' कार्यालयात जाण्यापूर्वी सिसोदिया यांनी मथुरा रस्त्यावरील आपल्या निवासस्थानी आपल्या आईचा आशीर्वाद घेतला. 'सीबीआय' कार्यालयाकडे जात असताना सिसोदिया यांच्या ताफ्यात अनेक नेते व कार्यकर्त्यांचा समावेश होता.

या वेळी देशभक्तीपर गीते ऐकवली जात होती. या प्रवासात दोन ठिकाणी सिसोदिया थांबले.

# शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढणार, केंद्र सरकारकडून मोठं गिफ्ट

## सहा पिकांच्या MSP मध्ये वाढ




**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेतील पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्यानंतर पंतप्रधांनानी शेतकऱ्यांना आणखी एक गिफ्ट दिलं आहे. सरकारने रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ केली आहे. यामुळे शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढणार आहे.

केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी माहिती दिली की, गहू, मसूर, जव आणि चणे यांसह रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ केली आहे. गव्हाच्या आधारभूत किमतीत ११० रुपये, जव १०० रुपये, चणे १०५ रुपये आणि मसूरवर ५०० रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. याशिवाय राईवर ४०० रुपये प्रतिक्विंटल वाढ करण्यात आली आहे. सूर्यफुलाच्या किमतीतही प्रतिक्विंटल २०९ रुपयांची वाढ झाली आहे.

एमएसपी समितीने रब्बीच्या सहा पिकांच्या किंमतीत ९ टक्क्यांनी आधारभूत किंमत वाढवण्याची मागणी केली होती. कृषि मंत्रालयानेही या सहा पिकांच्या किंमतीत वाढ करण्याची मागणी केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाने यावर शिक्कामोर्तब केलं आहे. शेतकऱ्यांचा नफा वाढावा याकरता सरकारने ही पावलं उचलली आहेत. २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेची पूर्तता करण्याकरता आधारभूत किमतीत वाढ करण्यात आली आहे.

### पंतप्रधान शेतकरी सन्मान संमेलन 2022

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन संस्थेत पंतप्रधान शेतकरी सन्मान संमेलन 2022 चे उद्घाटन केले. पंतप्रधानांनी रसायने आणि खते मंत्रालयांतर्गत 600 प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्रांचेही (पीएमकेएसके) उद्घाटन केले. याशिवाय, पंतप्रधानांनी, प्रधानमंत्री भारतीय जन उर्वरक योजना – एक राष्ट्र एक पिक याचा शुभारंभ केला. या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधानांनी थेट लाभ हस्तांतरणाद्वारे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) अंतर्गत 16,000 कोटी रुपयांचा 12 वा हप्ता देखील जारी केला. पंतप्रधानांनी कृषी स्टार्टअप परिषद आणि प्रदर्शनाचे उद्घाटनही केले. या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधानांनी 'इंडियन एज' हे खतावरील ई-मासिकही प्रकाशित केले. मोदींनी स्टार्टअप प्रदर्शनाच्या संकल्पना पॅव्हेलियनचा आढावा घेतला आणि प्रदर्शनातील उत्पादनांची पाहणी केली.**

# दीपिका पदुकोणच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

दीपिका पदुकोण ही बॉलिवूडची सर्वात प्रतिभावान आणि सुंदर अभिनेत्री मानली जाते. दीपिका केवळ भारतातच नाही तर परदेशातही खूप लोकप्रिय आहे. 'ओम शांती ओम' मधून आपल्या फिल्मी करिअरची सुरुवात करणाऱ्या दीपिकाने अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. दीपिकाने आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. आता तिच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यामुळेच दीपिका पदुकोणचा जगातील टॉप १० सुंदर महिलांच्या यादीत समावेश झाला आहे. नुकतीच एका शास्त्रज्ञाने ही जाहीर केली आहे. त्याने जगातील सर्वात सुंदर महिलांच्या सौंदर्य मोजण्यासाठी एका प्राचीन ग्रीक तंत्राचा वापर केला. त्यासोबत त्याचे कॉम्प्युटरवर मॅपिंग केले आणि निष्कर्ष काढला. या पद्धतीला 'गोल्डन रेशो ऑफ ब्युटी' असेही म्हणतात. त्याच्या तंत्रानुसार जोडी कॉमर हिला जगातील सर्वात सुंदर महिला घोषित करण्यात आले आहे. त्याचबरोबर बियॉन्से आणि किम कार्दशियन यांनीही टॉप १० मध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. बॉलिवूड अभिनेत्री



दीपिका पदुकोण ही जगातील १० सर्वात सुंदर महिलांच्या यादीत समावेश झालेली एकमेव भारतीय अभिनेत्री ठरली आहे. या यादीत दीपिका नवव्या क्रमांकावर आहे. तिला ९१.२२ गुण मिळाले आहेत. प्राचीन ग्रीकच्या मते, एखाद्याच्या चेहऱ्यावर आणि शरीरावरील विशिष्ट गुणोत्तरानुसार सौंदर्य मोजले जाऊ शकते. या यादीत झेंडाया, बेला हदीद, बियॉन्से, एरियाना ग्रांडे, टेलर स्विफ्ट, जॉर्डिन डन, किम कार्दशियन, दीपिका पदुकोण आणि होयॉन जंग या १० महिलांनी स्थान पटकावले आहे.

# मराठीतील 'सुपरस्टार' सचिन पिळगावकर यांना यंदाचा गंधार गौरव पुरस्कार जाहीर

**अभिनेते सचिन पिळगावकर गेली अनेकवर्षे चित्रपटसृष्टीत कार्यरत आहेत. मराठी तसेच हिंदी सिनेसृष्टीत त्यांनी आजवर वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. त्यांची पत्नी सुप्रिया पिळगावकर यादेखील गेली अनेकवर्षे मालिका, चित्रपटांमधून काम करताना दिसून येत आहेत. सचिन आणि सुप्रिया या दोघांची मुलगीदेखील अभिनयात सक्रिय आहे. बालकलाकार म्हणून त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. आजवर त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.**



सचिन पिळगावकर यांना नुकताच आणखीन एक पुरस्कार जाहीर झाला आहे. बालदिनाचे औचित्य साधून यंदाचा गंधार गौरव पुरस्कार सचिन पिळगावकर यांना यंदाचा जाहीर करण्यात आला आहे. बालदिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार सोहळा १४ नोव्हेंबर २०२२ रोजी गडकरी रंगायतन येथे सकाळी ११ वा. आयोजित करण्यात आला आहे, मंगळवारी ज्येष्ठ अभिनेते विजय गोखले यांनी गडकरी रंगायतन येथे ही माहिती दिली आहे. गंधार या बालनाट्य संस्थेच्यावतीने गंधार गौरव सोहळ्याचे दरवर्षी आयोजन केले जाते. यंदाचे हे सातवे वर्षे आहे. ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी, विद्या पटवर्धन, दिलीप प्रभावळकर, अशोक समेळ, नरेंद्र आंगणे, अतुल परचुरे यांना आतापर्यंत गंधार गौरव सोहळ्याने सन्मानित करण्यात आले आहे. यंदाचा हा पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते पिळगावकर यांना देण्यात येत आहे. मुंबई भाजपा अध्यक्ष, आमदार ॲड. आशिष शेलार आणि ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की यांच्या हस्ते पिळगावकर याना पुरस्कार देण्यात येणार आहे.




# अभिनेता अमित मेहता यांची बॉलिवूडमध्ये दमदार एन्ट्री

मुंबई : 'लव्ह यू लोकतंत्र' हा चित्रपट 14 ऑक्टोबर रोजी सर्वत्र प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळत आहे. या सिनेमातून अभिनेता अमित मेहता यांनी बॉलिवूडमध्ये दमदार एन्ट्री केली आहे. त्यांच्या अभिनयाचं सर्वत्र कैतुक केले जात आहे. हा सिनेमा अभय निहलानी यांनी दिग्दर्शित केला आहे. 'लव्ह यू लोकतंत्र' या सिनेमाची वास्तववादी कथा अशी मांडणी आहे. हा आजच्या राजकीय गोंधळावर भाष्य करणारा असा एक विषय आहे. या चित्रपटात ईशा कोप्पीकर, रवी किशन, अमित मेहता, मनोज जोशी, स्नेहा उल्लाल, अली असगर, कृष्णा अभिषेक आणि सपना चौधरी हे महत्वापूर्ण भूमिकेत आहेत. लव्ह यू लोकतंत्र या चित्रपटात अभिनेता अमित मेहता यांनी अप्रतिम अभिनय केला आहे. त्यांचा हा बॉलिवूडमधईल पहिला सिनेमा आहे. अमित मेहता यांच्या अभिनयाने प्रेक्षकांना वेड लावले आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. हा सिनेमा दुसऱ्या आठवड्यातही धुमाकुळ घालत आहे. सोबतच, या चित्रपटात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी गाणे गायले आहे. अमृता फडणवीस यांनी या गाण्यासह बॉलिवूडमध्ये एन्ट्री केली आहे. सोबतच बॉलिवूडमधील प्रसिद्ध गायक शान यांच्यासोबत अमृता फडणवीस यांनी 'धडका दिल' हे गाणं गायलं आहे. या चित्रपटातील 'धडका दिल' या गाण्याची सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले आहे.

# "भेटा डॉ. अंकिताला.." क्रिती सेनॉनचा आगामी 'भेडिया'

या चित्रपटाचा नवे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले. २०२१ मध्ये प्रदर्शित झालेला क्रिती सेनॉनचा 'मिमी' हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटातील भूमिकेसाठी तिला अनेक पुरस्कार मिळाले. त्यानंतर तिचे 'हम दो हमारे दो', 'बच्चन पांडे' आणि 'हिरोपती २' असे चित्रपट प्रदर्शित झाले. या चित्रपटांना प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. ती ओम राऊत दिग्दर्शित 'आदिपुरुष' या बहुचर्चित चित्रपटामध्ये जानकी हे पात्र साकारले आहे. या वर्षामध्ये क्रितीचा आणखी एक चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. क्रिती सेनॉनचा 'भेडिया' (BHEDIYA) हा चित्रपट पुढच्या महिन्यामध्ये बॉक्स ऑफिसवर दाखल होणार आहे.



# मित्रांच्या अतूट नातेसंबंधांची गोष्ट उलगडणार

नुकताच अमिताभ बच्चन यांचा 'गुडबाय' या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद दिला. रश्मिका मंदाना हिने या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आहे. आता याच वर्षी अमिताभ आणखी एका चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. पुढच्या महिन्यामध्ये त्यांचा राजश्री प्रोडक्शनमध्ये बनलेला 'ऊंचाई' हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटासाठी प्रेक्षक चांगलेच उत्सुक आहेत.

काही दिवसांपूर्वी त्यांच्या 'ऊंचाई' या चित्रपटाचे नवे पोस्टर इन्स्टाग्रामवर शेअर केले. या पोस्टरद्वारे या चित्रपटातला त्यांचा लूक समोर आला होता. अमिताभ यांच्या पाठोपाठ अभिनेते अनुपम खेर यांचाही या चित्रपटातील लूक समोर आला होता. आता या



चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. २ मिनिटं ५० सेकंदाच्या य ा ट्रेलरमध्ये य ा चित्रपटसृष्टीत मुरलेले कलाकार आणि त्यांची जुगलबंदी प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे. चित्रपटाची कथा ६० वर्षं पार केलेल्या ४ मित्रांच्या भोवती लिहिली गेली आहे. या ४ पैकी एका मित्राचं निधन होतं, आणि केवळ त्या मित्राची इच्छा पूर्ण करण्यासाठी उरलेले तिघे मित्र हे माऊंट एव्हरेस्ट शिखर चढायचं ठरवतात. असं एकंदर या चित्रपटाचा ट्रेलर बघून अंदाज येत आहे.

## शॉर्ट न्यूज »

### BCCIच्या अध्यक्षपदी रॉजर बिन्नी यांची नियुक्ती; सचिवपदी जय शाह कायम

**। मुंबई । महाईन्यूज**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) अध्यक्षपदी माजी क्रिकेटपटू रॉजर बिन्नी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज (१८ ऑक्टोबर) बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण पार पडली. या सभेत बिन्नी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. बिन्नी सौरव गांगुली यांच्याकडून अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारतील. विशेष म्हणजे जय शाह हे सचिवपदी कायम असतील. आयसीसी'च्या अध्यक्षपदासाठी केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर आणि माजी 'बीसीसीआय' अध्यक्ष एन. श्रीनिवासन यांच्याही नावांची चर्चा होती. श्रीनिवासन या पदासाठी पात्रही ठरत होते. मात्र, श्रीनिवास यांचे वय ७८ वर्षे असून त्यांच्या उमेदवारीला 'बीसीसीआय'कडून पाठिंबा मिळण्याबाबत साशंकता व्यक्त करण्यात आली होती. दुसरीकडे अनुराग ठाकूर हिमाचल प्रदेशातील निवडणुकीत व्यग्र असण्याची शक्यता असल्यामुळे त्यांचे नावही वगळण्यात आले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# टी20 विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत कोणते संघ खेळणार?

## सचिन तेंडुलकरने केली भविष्यवाणी

**अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

आयसीसी टी२० विश्वचषकाची सुरुवात झाली आहे. ऑस्ट्रेलियामध्ये होणाऱ्या या स्पर्धेविषयी अनेक तर्क-वितर्क केले जात आहेत. दरम्यान, भारताचा दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यानेही आपल्या टॉप चार संघांची निवड केली आहे. इतकंच नाही तर कोणता संघ डार्क हॉर्स ठरू शकतो याचाही खुलासा त्याने यावेळी केला आहे.

एका मुलाखतीमध्ये सचिन म्हटलंय, "भारतीय संघ चॅम्पियन व्हावा अशी माझी इच्छा आहे. तथापि, भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड या संघांचा माझ्या टॉप चारमध्ये समावेश आहे. तर न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका हे दोन संघ डार्क हॉर्स आहेत, कारण त्यांना सर्व परिस्थिती माहित आहेत. दक्षिण आफ्रिकेने सप्टेंबर-ऑक्टोबर याच परिस्थितींचा सामान केला आहे. हे दोन्हीही संघ कधीही टॉप-४ मध्ये प्रवेश करू शकतात." ऑस्ट्रेलियातील खेळपट्टीच्या आधारावर सचिनने आपले टॉप चार संघ निवडले आहेत. मात्र यातील कोणते संघ खरंच उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचतील हे वेळ आल्यावरच समजेल. दरम्यान, २३ ऑक्टोबरला भारत आपला पहिला सामना पाकिस्तानविरुद्ध खेळेल. पहिल्या सराव सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा ६ गडी राखून पराभव केला होता. त्याचवेळी इंग्लंडने पाकिस्तानवर ६ विकेट्सने मात केली.

### टी20 विश्वचषकासाठी समालोचन पॅनेल जाहीर

आयसीसीने टी२० विश्वचषकात सहभागी समालोचकांची यादी जाहीर केली आहे. समालोचकांची या यादीमध्ये भारताच्या हर्षा भोगले, रवी शास्त्री आणि सुनील गावसकर यांचा समावेश आहे. याशिवाय नुकतेच निवृत्त झालेले इयॉन मॉर्गन, प्रेस्टन मॉमसेन, डेल स्टेन आणि नियाल ओब्रायन यांसारखे माजी क्रिकेटपटूही सामन्यादरम्यान समालोचन करताना दिसतील. या स्पर्धेसाठी नामांकित २९ समालोचकांच्या गटात मेल जोन्स, इसा गुहा आणि नताली जर्मनोस महिला समालोचक म्हणून उपस्थित राहतील.



# नेदरलँड्सच्या विजयाने श्रीलंकेच्या अडचणीत भर

## पंजाबच्या फलंदाजाची जबरदस्त खेळी

**। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था**

नेदरलँड्सने टी२० विश्वचषक मध्ये सुपर-१२ च्या दिशेने वाटचाल सुरु केली आहे. मंगळवारी झालेल्या सामन्यात या संघाने नामिबियाचा पाच गडी राखून पराभव केला. संघाचा हा सलग दुसरा विजय आहे. यापूर्वी त्यांनी यूएईविरुद्धही विजय मिळवला होता. या सामन्यात प्रथम खेळताना नामिबियाने ६ बाद १२१ धावा केल्या. वेगवान गोलंदाज बास डी लीडेने ३ षटकात १८ धावा देत २ बळी घेतले. प्रत्युत्तरात नेदरलँडने १९.३ षटकांत १२२ धावा करताना ५ गडी राखून लक्ष्य गाठले. पंजाबमध्ये जन्मलेल्या विक्रमजीत सिंगने नेदरलँडच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने ३१ चेंडूत ३९ धावा केल्या. त्याने पहिल्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारीही केली. लक्ष्याचा पाठलाग करताना मॅक्स ओडौड आणि विक्रमजीत सिंग यांनी नेदरलँडला चांगली सुरुवात करून दिली.दोघांनी पहिल्या विकेटसाठी ८.२ षटकांत ५९ धावा जोडल्या.

विक्रमजीतने आपल्या खेळीत ३ चौकार आणि २ षटकार ठोकले. यावेळी त्यांचा स्ट्राइक रेट १२६ चा होता. यानंतर ओडौड आणि बास डी लीडे यांनी धावसंख्या ९२ धावांवर नेली. औदौड ३५ चेंडूत ३५ धावा करून धावबाद झाला. जेजे स्मिथने १६व्या षटकात २ धक्के दिले.




महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000



महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही